# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ३०५–२०१०/ दिनांक :

श्री. यशवंत रामचंद्र गुळवणी व इतर,
स.नं. ९२६, केदार पार्क, साने गुरुजी वसाहत, कोल्हापूर — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, कोल्हापूर

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
शहर विभागीय कार्यालय, कोल्हापूर

३) उप कार्यकारी अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
पश्चिम उप विभागीय कार्यालय, कोल्हापूर शहर

— विरूध्द पक्षकार

<u>**कोरम**</u> :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल )
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## <u>न्याय निर्णय</u>

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. यशवंत रामचंद्र गुळवणी व इतर, स. नं. ९२६, केदार पार्क, साने गुरुजी वसाहत, कोल्हापूर यांनी अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनिमय २००६ मधील नियम ६.१० नुसार मंचामध्ये दि. ३०.१०.२०१० ला गाऱ्हाणे दाखल केले. त्याचा तपशील खालील प्रमाणे –

श्री. यशवंत रामचंद्र गुळवणी व इतर दहा ग्राहकांना वितरण कंपनीने एन.डी.डी.एफ. या योजनेखाली वीज कनेक्शन्स मंजूर व विद्युत पुरवठा चालू करुन घेतला. ग्राहकांनी वितरण कंपनीने एन.डी.डी.एफ. खाली रु. ४१२२१/– मंजूर दिली असतांना वि.प.ने रु. ३२९४४/–इतक्या रकमेचा परतावा मंजूर केला आहे तो चुकीचा आहे. कंपनीने मंजूर केलेल्या अंदाजपत्रक़ातील रकमेप्रमाणे परतावा मिळावा अशी मागणी केली आहे. अंतर्गत कक्षाने आपल्या दि. २९.१०.२०१० च्या आदेशात तक्रारदार यांना रु. ३२९४४/– इतका परतावा बिलातून द्यावा असे आदेश दिले. या आदेशाच्या नाराजीने ग्राहकाने प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दाखल केली. त्यामध्ये संर्पूण परतावा मिळावा व लाईनवरुन इतरांना जोडण्या देवू नयेत, दिलेली कनेक्शन बंद व्हावी अशी मागणी केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. १५.१२.२०१० च्या लेखी अहवालात अंतर्गत कक्षाच्या आदेशानुसार संबंधित ११ तक्रारदार यांना प्रत्येकी रु. २९९४/– या प्रमाणे एकूण ३२९४४/– इतका परतावा डिसेंबर २०१० च्या वीज बिलातून देण्यात येत आहे असे म्हटले आहे. दि. १८.१२.२०१० रोजी या प्रकरणातील श्री. भिकाजी पाटील या ग्राहकाने मंचामध्ये लेखी अर्ज दाखल करुन त्यांच्या तक्रारी बाबत शाखा कार्यालयाचे पातळीवर निवारण झाले आहे, त्यामुळे तक्रारीस कारण राहिले नाही, तक्रार अर्ज निकाली काढावा अशी विनंती केली आहे.

प्रस्तुत तक्रारीची सुनावणी मंचासमोर दि. २२.१२.२०१० रोजी घेतली असतां, तक्रारदार गैरहजर. वि.प.चे अधिकारी उपस्थित. त्यांनी सर्व ग्राहकांना बिलातून परतावा दिल्याचे मंचासमोर सांगितले. त्यामुळे ग्राहकाचे दि. १८.१२.२०१० च्या अर्जानुसार तसेच वि.प.च्या अधिकाऱ्यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांच्या आदेशाची अंमलबजावणी केल्याने ग्राहकाची तक्रार निकाली काढण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश –

## आदेश

१) तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.